The journal has been uploaded in UGC CARE PORTAL. (RTI)
Page No. 20 | http://www.epitomejournals.com Vol. 7, Issue 8, August 2021, ISSN: 2395-6968

Epitome : International Journal of Multidisciplinary Research
ISSN : 2395-6968

# YUVKANCHYA VIKASAT RASHTRIYA SEVA YOJNECHI MAHATVACHI BHUMIKA VA YOGDAN



Shivaji Dattatraya Lendikar
M. A. (Eng.), M. A. (Pol. Sci.),
M. Ed., Set (Edn.), C.P.C.T.
Shri Rangnath Maharaj Secondary and Higher
Secondary School Waghrul (J) Tq & Dist. Jalna-431203

Impact Factor = 4.153 (2018), Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EIJMR All rights reserved.

# युवकांच्या विकासात राष्ट्रीय सेवा योजनेची महत्वाची भुमिका व योगदान

**श्री शिवाजी दत्तात्रय लेंडीकर ( उच्च माध्यमिक शिक्षक)**
[ M.A.(Eng.),M.A.(Pol.Sci.),M.Ed.,SET(Edn.),C.P.C.T. ] **रा.से.यो.कार्यक्रमाधिकारी**
Mob No : 9421645677, 9172425577
**श्री.रंगनाथ महाराज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,**
**वाघ्रुळ (ज) ता. जि. जालना**

## सारांश

भारत हा युवा शक्तीचा देश आहे. युवकांच्या शक्तीला सकारात्मक दिशेने घेऊन जाण्यासाठी युवकांच्या मनात राष्ट्र विषयक बीजाची जोपासना करून त्याचा वटवृक्ष बनवायचा असेल तर राष्ट्रीय सेवा योजना सारखे दूसरे व्यास्पीठ नाही. युवकांच्या व्यक्तिमत्व विकासाकरीता त्यांच्या व्यक्तिमत्व विकासाच्या विविध पैलुंना फुलवण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना सातत्याने कार्यरत आहे. समाजाच्या सेवेतून विद्यार्थ्याचा व्यक्तिमत्व विकास साकारण्यासाठी तसेच शिक्षणाद्वारे समाजसेवा घडविण्यासाठी ही सेवा महत्वाची आहे. शासनाच्या योजना युवकांच्या माध्यमातुन शेवटच्या व्यक्ति पर्यंत नेण्यासाठी ही योजना कार्यरत आहे. व राहील. विद्यार्थ्यांना सामाजिक सेवेच्या उपक्रमामध्ये सहभागाची संधी सदर योजना प्राप्त करून देते. यामुळेच आदर्श नागरिक निर्माण होतील म्हणुन रा.से.योजना एक मोठी विद्यार्थी चळवळ बनली आहे. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या मनात सामाजिक जाणीव निर्माण करणे व त्याचा सर्वांगिण व्यक्तिमत्व विकास घडवून आणने या उद्देशाने राष्ट्रीस सेवा योजनेची स्थापना झाली. स्वावलंबन, चारित्र्य वर्धन व सामाजिक बांधिलकी या मुल्यांचा समन्वय नविन शिक्षणपध्दतीत घडवून आणण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना भारत सरकारच्या युवाकल्याण व क्रिडा मंत्रालयाअंतर्गत राबविण्यात येत आहे. राष्ट्रीय सेवा योजना हि संकल्पना सांगतांना त्यात सेवा आणि त्याग हे शब्द युवकांच्या सेवेचे महत्व विषद करतात. माझ्यासाठी नव्हे तर तुमच्यासाठी “Not Me, But You” या राष्ट्रीय सेवा योजनेच्या ब्रिद वाक्यामध्ये योजनेच्या महानतेची कल्पना आपणास येते. समाजात सामाजिक जाण देणारा, जण जागृती करणारा तसेच राष्ट्र व समाजाप्रती जबाबदारीचे कार्य करणारा राष्ट्रीय सेवा योजना हा भारत सरकारचा अभिनव उपक्रम आहे

**राष्ट्रीय सेवा योजनेच्या संदर्भात महत्वाच्या संकल्पना :** राष्ट्रीय सेवा योजनेचे ध्येय, उदिष्टे, ब्रिदवाक्य व बोधचिन्ह हे या उपक्रमाचे स्वरूप आणि कार्य स्पष्ट करतात.

## प्रस्तावना

समाजातील युवकांना सामाजिकतेचे भान प्राप्त करून समाजाला उन्नत करण्याचे काम राष्ट्रीय सेवा योजना करत आहे. महाविद्यालयीन युवक-युवतींच्या मनात सामाजिक जाणीव निर्माण करण्यासाठी व त्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्वाचा विकास घडवुन आणण्याच्या उद्देशाने महात्मा गांधीजींच्या जन्मशताब्दी वर्षापासून म्हणजे २४ सप्टेंबर १९६९ पासून सरकारच्या युवा कल्याण व क्रीडा मंत्रालयामार्फत राष्ट्रीय सेवा योजना राबविण्यात येते.

१९६९ मध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी , पंडित नेहरू व डॉ. राधाकृष्णन या महामानवांच्या उदात्त संकल्पनेतून व विचारावर साकारलेली योजना आहे.

शिक्षण ही निंरतर चालणारी मानवी समाजातील विकसनाची प्रक्रिया आहे. जन्मल्यापासुन ते मृत्यूपर्यंत मानव प्राणी व इतर प्राणीही शिकत असतात. आपण मानवी समाजातील शिक्षणाचा या ठिकाणी विचार करणार आहेत. समाजिकीकरणाच्या प्रक्रियेत व्यक्ती विकासाच्या दृष्टीने शिक्षण संक्रमणाची प्रक्रिया महत्वाची आहे. मुल प्रथम आपल्या आईला ओळखते. नंतर हळुहळु घरच्या व्यक्तींना, संबंधित नातेवाईकांना आणि चालु-बोलु लागण्यास घराबाहेरच्या विश्वाशी त्याचा संबंध येतो. त्यामुळे बाह्यविश्वात असणा-या मित्र, शेजारी व शिक्षक इत्यादी अनेक घटकांमधुन व्यक्तीची वाढ होत असते. ब-या-वाईटाचे ज्ञान त्यास सतत होत राहते. कुटुंबातील संस्कार विचारधारा, रीती, पंरपरा, बोलणे इत्यादी घटक व्यक्तिमत्वावर सकारात्मक व नकारात्मक ही परिणाम करीत असतात. प्रथम कुटुंब व नंतर समाज या व्यापक शाळेमध्ये व्यक्तिचे वर्तन निर्धारित होत असते. व्यक्तिच्या जीवनाची जडण-घडण समाजाबरोबर त्याच्या औपचारिक शिक्षणातूनही होत असते. त्यास बालवाडी, अंगणवाडी, प्राथमिक शाळा ते महाविद्यालयापर्यंत जे वातावरण लाभते जे सवंगडी, जे शिक्षक लाभतात त्यांच्या विचारांचा, शाळेच्या शिस्तीचा त्याच्यावर खोल ठसा उमटत जाऊन व्यक्तिमत्वाचे विविध पैलू या त्याच्या आयुष्याला अखंड अशा मा्गील ऐतिहासिक पार्श्वभूमीशी संबंधित असतात. शिक्षण संक्रमणाची प्रक्रिया ही सामाजिक जीवनशैलीतील नियंत्रित वर्तनात अत्यंत महत्वाची भूमिका पार पाडत असते. व्यक्मिमत्वाच्या विकासातील आदर्शवादी बाबींची निर्मिती यामधून होत असते. त्यामुळे एक जबाबदार समाज निर्मितीच्या कामी शिक्षण ही बाब महत्वपुर्ण आहे.

अब्राहम लिंकन यांच्या हेडमास्तरास पत्राच्या आशयात हेच आहे की, माझ्या मुलाला त्याच्या कर्तव्याची जाणीव करुन द्या. या समाजात चांगले ही आहे वाईट ही आहे, ते त्याला कळू द्या. त्याला त्याच्या कष्टाची जाणीव निर्माण करून समाजाबाबत आपल्या योगदानाची आठवण यास करून द्या. त्याला जगण्याचे सामर्थ्य शिकवा. हे मत व्यक्तिमत्वाच्या विकासात शिक्षक आणि शिक्षणाची भूमिका किती महत्वाची आहे याची सहज कल्पना येते. शिक्षणाने शहाणपण, कर्तव्यदक्षता आणि समाजाची प्रगती साधण्यासाठीची एक व्यवस्था निर्माण करता येते. न्याय, समता, नितीतत्व, खरेपणा तसेच ज्ञानाच्या कक्षा वाढुन अशा ज्ञानाचा विश्वाच्या कल्याणासाठी उपयोग होत असतो. म्हणुन आज तमाम जगाच्या मानवी समाजाची प्रगती व सुखकर जीवन शिक्षणाने होत आहे. सारे विश्व शिक्षणामुळे अधिक जवळ आले आहे.

वर्तमानातील समस्या सोडविण्यासाठी आणि भविष्यासाठी तार्किकदृष्टया योजना आखण्यासाठी भुतकाळाचे ज्ञान आवश्यक आहे. म्हणुनचं संशोधक हल्लीच्या कार्यात रा.से योजनेच्या उतारांचा शोध घेत आहे. राष्ट्रीय सेवा योजना राजकिय प्रेरित संघटना जाती आणि धर्मभेद यांच्याशी संबंधित असलेल्या विद्यार्थ्यांचे वेगवेगळे एकत्र आणण्यासाठी एक सामान्य व्यासपीठ म्हणुन काम करते. राष्ट्रीय सेवा योजना त्यांना भावनिक एकात्मता तसेच राष्ट्रीय स्तरावरील शिबिरोने राष्ट्रीय एकत्रीकरणासाठी सक्षम करते.

भारतामध्ये तसेच महाराष्ट्रामध्ये विविध प्रकारच्या लोक कल्याणकारी योजना, कार्यक्रम समाजाच्या उन्नतीसाठी , प्रगतीसाठी व विकासासाठी शासनस्तरावर राबविण्यात येतात. त्यामध्ये भारत सरकारच्या युवा

कल्याण व क्रिडा मंत्रालयाअंर्तगत शिक्षण विभागामध्ये राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजना, कमवा व शिका योजना, राष्ट्रीय साक्षरता कार्यक्रम राबविण्यात येतात. तसेच महाराष्ट्रातील शैक्षणिक कार्यक्रमामध्ये प्रौढ साक्षरता कार्यक्रम, राज्य साक्षरता कार्यक्रम, मध्यान्न भोजन योजना, अहिल्याबाई होळकर योजना, खडु - फळा मोहिम, सर्व शिक्षा अभियान, महिलांना मोफत शिक्षण इत्यादी योजना राष्ट्र व राज्य स्तरावर राबविण्यात येतात. त्यापैकी राष्ट्रीय सेवा योजनेचे सामाजिक जीवनामध्ये योगदान या विषयी सविस्तर माहिती घेवु या. कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या मनात सामाजिक जाणीव निर्माण करणे व त्यांचा सर्वांगीण व्यक्तिमत्व विकास घडवून आणणे या उद्देशाने राष्ट्रीय सेवा योजनेची स्थापना झाली.

स्वावलंबन, चरित्र्यवर्धन व सामाजिक बांधिलकी या मुल्यांचा समन्वय नवीन शिक्षण पध्दतीत घडवून आणण्यासाठी महात्मा गांधीच्या जन्मशताब्दी वर्षापासुन म्हणजे २४ सप्टेंबर १९६९ साली महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय सेवा योजना भारत सरकारच्या युवा कल्याण व क्रिडा मंत्रालयांतर्गत राबविण्यात येत आहे.

राष्ट्रीस सेवा योजनेचा प्रारंभ करण्यासंबंधीची संकल्पना ही महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरू यांची आहे. स्वातंत्र्योत्तर काळात देशातील तरूणांची विशेषतः महाविद्यालयीन आणि विद्यापीठीय युवकांनी देशातील लोकांच्या सेवेसाठी काही रचनात्मक कार्य केले पाहिजे. भारत हा खेडयांचा देश असल्या कारणाने खेडयातील जनतेला स्वातंत्र्याची सर्व फळे उपभोगता आली पाहिजे. यासाठी त्यांना कार्यप्रवण केले पाहिजे. म्हणुन १९५० मध्ये विद्यापीठ आयोगाचे अध्यक्ष डॉ. राधाकृष्णन यांनी महात्मा गांधी युगातील आदर्श शिक्षण क्षेत्रात राबविण्यासाठी विचार विनिमय करण्याच्या हेतुने जानेवारी १९५० मध्ये एक बैठक आयोजित केली. त्या आधारे १९५२ मध्ये पहिल्या पंचवार्षिक योजनेत समाजसेवा आणि शारीरिक श्रम यावर अधिक भर देणारी विद्यार्थ्यांशी शिबीरे आयोजित करण्याची योजना आखली. १९५८ मध्ये जवाहरलाल नेहरूंनी महाविद्यालयीन आणि विद्यापीठाय पातळीवर विद्यार्थ्यांना पदवीचे शिक्षण पुर्ण करतांना नऊ महिन्यांपासुन ते एक वर्षापर्यंत समाजसेवेचे ग्रामिण भागात कार्य करावे अशा प्रकारची एक योजना आखावी असे सूचविलेले होते. १९५९ च्या शिक्षण मंत्र्यांच्या दिल्ली येथील बैठकीत अशा प्रकारची योजना तयार करावी म्हणून एका समितीची स्थापना डॉ.सी.डी. देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली निर्माण करण्यात आली. या समितीने अतिशय महत्वाच्या शिफारशी केल्या. १९६० मध्ये प्रा.के.जी. सय्यदीन यांनी वेगवेगळया देशांचा अभ्यास करून नॅशनल सर्वीस फॉर द युथ हा अहवाल दिला. १९६४ मध्ये भारत सरकारच्या शिक्षण सुधारणा आयोगाचे अध्यक्ष डॉ.दौलतसिंह कोठारी यांनी आपल्या अहवालामध्ये विद्यार्थ्यांनी समाजसेवा करण्यासंबंधी कोणत्या प्रकारच्या योजना राबवाव्यात यासंबंधीची शिफारस केली.

मे १९६९ मध्ये कुलगुरूंच्या उपसमितीची बैठक होऊन राष्ट्रीय सेवा योजनेचा मसुदा तयार करण्यास आला आणि २४ सप्टेंबर १९६९ रोजी त्यावेळचे शिक्षणमंत्री डॉ.व्ही.के.आर.व्ही.राव यांनी राष्ट्रीय सेवा योजना सुरू केल्याची घोषणा केली. महात्मा गांधी विचारांना राबविण्यासाठी, पंडित जवाहरलाल नेहरूंचे स्वप्न साकार करण्यासाठी ही योजना राज्य सरकारच्या सहकार्याने सुरू करण्यात आली. पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी या योजनेमुळे महाविद्यालयीन विद्यापीठीय युवकांना राष्ट्रीय छात्र सेनेप्रमाणे समाजसेवा आणि राष्ट्रसेवा करण्याची नवी संधी मिळत आहे. असे म्हटलेले होते. १९६९ मध्ये एक पायलट स्वरूपात देशातील केवळ ३७ विद्यापीठांत आणि केवळ ४० हजार विद्यार्थ्यांसाठीच ही योजना होती. हळुहळु ही योजना विस्तारली. सध्या देशातील ४०२

विद्यापीठांतील १६३३० महाविद्यालये आणि १९९९४ उच्च माध्यमिक विद्यालये / कनिष्ठ महाविद्यालये या योजनेत सक्रियपणे सहभागी आहेत. यावरून या योजनेची विद्यार्थी वर्गातील आत्मियता लक्षात येते.

युवक हे देशाचे आधारस्तंभ आहेत. आदर्श नागरिकांचे गुण विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे म्हणजेच त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास करणे होय. आजचा विद्यार्थी, युवक-युवती हे उद्याचे जबाबदार नागरिक आहेत. व हे आदर्श नागरिक निर्माण करण्यात राष्ट्रीय सेवा योजनेची महत्वाची भूमिका व योगदान आहे.आपल्या देशातील व उदयाच्या भावी नागरिकांमध्ये नव्या विचारांची लागवड करायची आहे व पुढील शंभर वर्षाचे नियोजन करायचे आहे.या कार्यात राष्ट्रीय सेवा योजनेची भुमिका अत्यंत महत्वाची आहे.

**राष्ट्रीय सेवा योजनेची गरज**

वर्तमानातील समस्या सोडविण्यासाठी आणि भविष्यासाठी तार्किकदृष्टया योजना आखण्यासाठी भुतकाळाचे ज्ञान आवश्यक आहे. म्हणुनचं संशोधक हल्लीच्या वर्षात रा.से.यो योजनेच्या चढ उतारांचा शोध घेत आहे. राष्ट्रीय सेवा योजना राजकिय प्रेरित संघटना जाती आणि धर्मभेद यांच्याशी संबंधित असलेल्या विद्यार्थ्यांचे वेगवेगळे विभाग एकत्र आणण्यासाठी एक सामान्य व्यासपीठ म्हणुन काम करते. राष्ट्रीय सेवा योजना त्यांना भावनिक एकात्मता तसेच राष्ट्रीय स्तरावरील शिबिराद्वारे राष्ट्रीय एकत्रीकरणासाठी सक्षम करते.

राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये शिक्षक (कार्यक्रम अधिकारी) , विद्यार्थी, (स्वंयसेवक ) आणि समाज हे तीन घटक महत्वाचे आहेत. कार्यक्रम अधिकारी हा नेतृत्व गुण निर्माण करणारा, नैतिक मुल्य जोपासणारा मार्गदर्शक तत्वाचे पालन करणारा, विशिष्ट धैया पर्यंत नेणारा, सामाजिक बांधिलकी निर्माण करणारा आणि स्वयंसेवकाचा व्यक्तिमत्व विकास घडविणारा असतो. युवकाविषयी म्हणजे स्वंयसेवक उत्तम व सुजान नागरिक बनु शकतो. समाज- स्वंयसेवकासाठी एक मुक्त विद्यापीठ असते. यात त्याला सामाजिक समस्या, प्रश्न अडीअडचणीची जाणीव होते. समाजसवो हिच इंश्वर सेवा आहे. या भावनेणे तो प्रेरित होतो.विविध अश्या सामाजिक समस्याचे निराकरण करण्यासाठी प्रयत्न करतो. स्वच्छतेकडुन सुदंरतेकडे नेण्यासाठी वैयक्तिक स्वच्छता परिसर, स्वच्छता , आहार स्वच्छता व स्वच्छ व शुध्द पिण्याचे पाणी, मानवी विष्ठेचे योग्य व्यवस्थापन , प्राण्याच्या मलमुत्राचे व्यवस्थापन, घनकचराचे व्यवस्थापन आणि सांड पाण्याचे योग्य व्यवस्थापन करण्यासाठी रासेयोचा स्वंसेवक सामाजिक बांधीलकीतुन काम करतांना दिसून येतो.

महाविद्यालयीन अभ्यासक्रमाला राष्ट्रसेवेची जोड देऊन राष्ट्रोध्दार कसा साधता येईल. या दृष्टीने १९५० ते १९६९ पर्यंत तत्कालीन विश्वविद्यालय आयोगाचे अध्यक्ष डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन, पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरू, केंद्रीय मंत्री डॉ. सी. डी. देशमुख, प्रा. के.जी. सैयद्दीन, शिक्षण समितीचे अध्यक्ष डॉ.दौलतसिंग कोठारी, शिक्षणमंत्री डॉ. व्ही . के. आर. व्ही. राव भारतातील विद्यापीठांचे कुलगुरू, विद्यार्थी प्रतिनिधी यांच्यात विचार विनिमय झाला.

राष्ट्रीय सेवा ही राष्ट्रीय एकात्मतेसाठी एक सशक्त साधन सिध्द होवु शकते. शहरी विद्यार्थ्यांना ग्रामीण जीवन अवगत होईल आणि महात्मा गांधी जन्म शताब्दी वर्षाचे औचित्य साधून दि. २४ सप्टेंबर १९६९ रोजी भारतातील सर्व राज्यांतुन ३७ विद्यापीठांत पदवीपुर्व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी दोन वर्षाकरीता प्रायोगिक तत्त्वावर राष्ट्रीय सेवा योजना सूरू करण्यात आली.

राष्ट्रीय सेवा योजनेचे सिध्दांत वाक्य आहे. मला नाही तुम्हाला निःस्वार्थ सेवाभाव त्यामागे आहे. रासयोच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार नियमित कार्यक्रम व विशेष शिबिर कार्यक्रम असे वर्गीकरण केले आहे. एका महाविद्यालयाने जवळचे खेडे दत्तक घेऊन त्याचा विकास साधण्याकरिता गावाच्या आवश्यकतेनुसार नियोजित प्रकल्प प्रतीकात्मक स्वरूपात विद्यार्थ्यांनी कार्यान्वित करावेत. त्यातुन त्यांचे संघटन कौशल्य विकसित होईल. अशाप्रकारे राष्ट्रीय सेवा योजना ही महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी वरदान ठरली आहे, यात शंका नाही.

**राष्ट्रीस सेवा योजनेचे महत्व**

राष्ट्रीय सेवा योजना ही संकल्पना सांगतांना त्यात सेवा आणि त्याग हे शब्द युवकांच्या आयुष्यातील सेवेचे महत्व विशद करतात. विशेषतः शिक्षण क्षेत्रातुन सेवा संस्कार तरूणांवर व्हावा, तरूणांकडून राष्ट्रसेवा घडावी, युवाशक्तीचा उपयोग राष्ट्राला व्हावा या हेतुने शिक्षण क्षेत्रात विविध योजना वेगवेगळया स्तरांवर राबविल्या जातात. शिक्षणक्षेत्रात कनिष्ठ स्तरापासून ते उच्च शिक्षण क्षेत्रातील राष्ट्रीय सेवा योजना या उपक्रमापर्यंत राष्ट्रसेवेची व्याप्ती वाढतांना दिसुन येते. 'माझ्यासाठी नव्हे तर तुमच्यासाठी' 'Not me, but you' या राष्ट्रीय सेवा योजनेचा ब्रिदवाक्यामध्ये योजनेच्या महानतेची कल्पना आपणास येते. हे वाक्य लोकशाही आणि समाजिक बांधिलकीची जाणीव करून देते. सर्व काही मानवाच्या कल्याणासाठीच आहे. ही महानता आपणास राष्ट्रीय सेवा योजनेत दिसते.राष्ट्रीय सेवा योजनेमुळे व्यक्तिक स्तरावर अनेक फायदे झालेले दिसुन येतात. त्यामध्ये स्वंयसेवकाचा सार्वागिण व्यक्तिमत्व विकास होतो. स्वंयसेवकाला सामाजिक समस्याची जाणीव होते व त्याचे निराकरण करण्याचे कौशल्य प्राप्त होते. विविध सामाजिक संस्थाशी परिचय होतो. स्वंयसेवकाला स्वंयरोजगाराची दिशा मिळते. विद्यार्थ्यांना अतिरिक्त गुण व प्रमाणपत्र मिळते. तसेच सामाजिक स्तरावर जनजागृती, शासनाच्या योजनांची माहिती लोकांनपर्यंत पोहचते. मानवी हक्क व लोकाधिकाराची माहिती समाजापर्यंत पहोचते. व्यक्तिक व सामाजिक समस्या सोडविण्यात स्वंयसेवकाचा मोठयाप्रमाणवर हात भार लागतो. स्वंयसेवकाद्वारे समाजात रचनात्मक कार्य केली जातात. उदा.घर,स्वच्छतागृह,रस्ते,बंधारे याची उभारणी , वृक्षारोपन व संर्वधन. तसेच आरोग्य विषयक सवलतीचे कार्य केली जातात. तसेच शासकिय स्तरावर रासेयो चे महत्व वाढत आहे. त्यामध्ये शासनाची धोरणे लोकांपर्यत पोहचविणे, मनुष्यबळाची उपल्धता, शासनाने दिलेल्या अनुदानाच्या अधिक संख्यात्मक व गुणात्मक फायदा शासनाला करून देणे.

**राष्ट्रीय सेवा योजनेची ठळक उदिष्टे पुढीलप्रमणे आहेत**.

१. ज्या समाजात आपण काम करतो त्या समाजाला समजुन घेणे.

२. स्वतःला संबंधित समाजाला समजुन घेण्यासाठी पात्र बनविणे.

३. समाजाच्या गरजांची माहिती करूण घेणे, त्यांच्या अडचणी समजुन घेणे व त्या दूर करणे की, ज्यामुळे तो समाज सक्रिय बनेल.

४. आपल्यामध्ये सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण करूण तीचा विकास करणे.

५. आपल्या शिक्षणाचा उपयोग व्यक्तिगत किंवा सामाजिक अडचणी दूर करूण त्यावर व्यावहारिक उपाय शोधण्यासाठी करणे.

६. समाजात मिसळण्यासाठी ज्या गुणांची गरज आहे, त्या गुणांचा आपल्यामध्ये विकास करणे.

७. नेतृत्व गुण धारण करून लोकशाही प्रवृत्तीचा विकास करणे.

८. साक्षर व निरक्षर यांच्यातील दरी कमी करणे.

९. संकटकाळी व नैसर्गिक आपत्तीत तोंड देण्याची पात्रता आपल्याअंगी बानविणे.

१०. राष्ट्रीय एकात्मतेचा प्रसार व विकास करणे.
११. समाजातील गरीब वर्गाची सेवा करण्याची इच्छा मनात जागृत करणे.
१२. राष्ट्रीय सेवा योजना ही संकल्पना व स्वरूप समजुन घेणे.
१३. राष्ट्रीय सेवा योजनेत प्रशिक्षित मनुष्यबळ तयार करण्साठी पर्याय अथवा न्याय स्पष्ट करणे.
१४. कनिष्ठ महाविद्यालयीन स्तरावर विद्यार्थ्यांचे राष्ट्रीय सेवा योजनेतील योगदानाची माहिती घेणे व जनजागृती करणे.

१५. राष्ट्रीय सेवा योजनेचे मुख्य उद्दिष्ट महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीयत्वाची जाणीव निर्माण करून त्यांना सामाजिक कार्याचा सराव करण्यास वाव देणे हे आहे.

**राष्ट्रीय सेवा योजनेची भूमिका खालील ठळक मुद्याच्या आधारे सांगता येईल.**

**१) श्रमप्रतिष्ठा**

राष्ट्रीय सेवा योजनेमुळे श्रमाला प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे.अलीकडे मोबाईलच्या जमान्यातील पिढीवर NSS च्या माध्यमातुन श्रमसंस्कार होतो. युवक विविध उपक्रमातुन व निवासी शिबीराच्या माध्यमातुन श्रमदान करतात. त्यांना शारिरिक श्रमाची जाणीव होते. अशाप्रकारे यूवकांत श्रमप्रतिष्ठा निर्माण करण्यात राष्ट्रीय सेवा योजना महत्वाची भूमिका पार पाडते.

**२) स्वावलंबन** राष्ट्रीय सेवा योजना युवकांवर स्वावलंबनाचा संस्कार करते स्वतःची सर्व कामे युवक स्वतः करतात. निवासी शिबीरातुन जेवन करणे, जेवण वाढणे, कपडे धुणे, ताटाची स्वच्छता करणे हे संस्कार त्यांच्यावर होतात. जे युवक घरी असल्यावर स्वतःला हवे असलेले पाणीसुध्दा आईला किंवा ताईला मागतात तेच युवकांमध्ये आल्यामुळे स्वावलंबी बनतात.

**३) राष्ट्रीय एकात्मतेच्या भावनेत वाढ**

राष्ट्रीय सेवा योजनेत आलेले सर्व युवक युवती यांच्यात राष्ट्रीय एकात्मतेची भावना वाढीस लागते. म्हणुन ख-या अर्थाने राष्ट्रीय एकात्मतेची भावना निर्माण करण्यात राष्ट्रीय सेवा योजना महत्वाची भूमिका पार पाडते.

**४) जबाबदारी जाणीव**

राष्ट्रीय सेवा योजनेमुळे युवकांना आपल्या जबाबदारीची जाणीव होते. घराप्रती असणारी जबाबदारी, समाजाप्रती, राष्ट्राप्रती आपल्या गावाप्रती आपली काहीतरी जबाबदारी आहे. हे युवक व युवतींना कळू लागते विद्यार्थी म्हणून आपले कार्य कर्तव्य आहे. हे युवक व युवतींना कळू लागते विद्यार्थी म्हणून आपले कार्य कर्तव्य आहे. समाजाचे आपण देणे लागतो. समाजाला समजून घेण्याची जबाबदारी युवकांत मोठया प्रमाणात वाढीस लागते.

**५) चारित्र्य संपन्न नागरिक**

राष्ट्रीस सवो योजनेत कार्यरत असणारे युवकावर चारित्र्य या नैतिक मूल्याचा संस्कार होतो. आपले उत्तम चारित्र्य या नैतिक मूल्याचा संस्कार होतो. आपले उत्तम चारित्र्य निर्माण करण्याचा तो प्रयत्न करतो. युवकांचे

चारित्र्य हे काचेच्या भांडयाप्रमाणे असते. चारित्र्य संपन्न व्यक्तिला समाजात खूप मोठी प्रतिष्ठा प्राप्त होते. राष्ट्रीय सेवा योजना युवकांत चारित्र्यनिर्माण करण्याची महत्वाची भुमिका पार पाडते. राष्ट्रीय सेवा योजनेत सहभागी स्वयंसेवक हे चांगल्या विचाराचे व चारित्र्यसंपन्न असतात.

**६) व्यसनाधिनतेपासून दूर ठेवण्यात मदत**

राष्ट्रीय सेवा योजनेतील ९५ टक्के युवक-युवती हे व्यसनापासून दूर असतात. कारण हेच युवक युवती गावात व्यसनमुक्तीचे काम करतात पथनाटय सादर करतात.

**७) लिंगभेदभावापासून अलिप्त**

राष्ट्रीय सेवा योजनेत लिंगभेदापासून अलिप्त राहण्याचा संस्कार केला जाते. स्त्रि-पुरूष असा भेदाभेद करू नये. स्त्रियांनासुध्दा पुरूषांच्या बरोबरीचे स्थान आहे. हा विचार युवक-युवतीमध्ये रूजविला जातो.

**८) नितीमूल्याची रुजवात**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून युवक-युवती यांच्यावर नितीमूल्यांचे संस्कार केले जातात. आज समाजात नैतिक -हास पावत चालले आहेत. परंतू नियमित कार्यक्रमाच्या माध्यमातून युवकांवर नितीमूल्यांचे शिक्षण देण्याचा संस्कार केला जातो. नितीमूल्यांची रूजवण जर युवकांच्या मनावर झाली तर ते विधायक कार्य करतात. समाजाची सेवा करतात. थोरा-मोठयांचा आदर करतात दैनंदिन जीवनात नितीने जीवन जगतात. नितीने आर्थिक व्यवहार करतात.

**९) सामाजिक प्रश्नांची जाणीव**

राष्ट्रीय सेवा योजनेमुळे विविध प्रश्न व समस्यांची जाणीव युवकांना होते. गरिबी, दारिद्रय, बेकारी, अज्ञान, या समस्या व प्रश्न ते समजून घेतात. शेतक-यांच्या प्रश्नांची जाणीव त्यांना होते. अनेक समाजातील असंख्य प्रश्नांमुळे युवकांना माहिती होतात. त्यावर उपाययोजना करण्यासाठी ते आपल्या क्षमतेनुसार प्रयत्न करतात.

**१०) नैसर्गिक आपत्तीच्या काळात धावून जाण्याची भावना**

नैसर्गिक आपत्तीच्या वेळा मदत केली पाहिजे ही भावना राष्ट्रीय सेवा योजनेमुळे युवकांत निर्माण होते. भारतासारख्या आकाराने मोठया असणा-या देशात नेहमीच आपत्तीच्या घटना घडतात. त्यावेळी NSS चे स्वंसेवक तात्काळ मदतीचा धावून जातात. पुरग्रस्तांना मदत, भुकंपग्रस्तांना मदत, दुष्काळग्रस्तांना मदत निधी गोळा करतात. या शिवाय आपत्तीच्या वेळी स्वतःच्या ठिकाणी जावून प्रत्यक्ष मदत करतात. संकटग्रस्तांचे दुःख कमी करण्याचे कार्य राष्ट्रीय सेवा योजनेचे युवक-युवती करतात.

**११) नेतृत्व गुणांचा विकास**

राष्ट्रीय सेवा योजनेमुळे युवक-युवती यांच्यात नेतृत्व गुणांचा विकास होतो. युवक-युवती यांच्यात विविध क्षेत्रात काम करतांना पुढाकार घेण्याची वृत्ती वाढीस लागते. अनेक कार्यक्रमाचे नेतृत्व ते करतात.

**१२) व्यक्तिमत्व विकास**

युवक-युवतींचा व्यक्तिमत्व विकास करणारी राष्ट्रीय सेवा योजना ही एक संघटना आहे. युवक-युवतीच्या राष्ट्रीय सेवा योजना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचे कार्य करते. त्यामुळे त्यांचा व्यक्तिमत्व विकास होतो.

**१३) पर्यावरण संवर्धनाची आवड निर्माण होते**

राष्ट्रीय सेवा योजनेमुळे युवक-युवतीत निसर्ग संवर्धनाची आवड निर्माण होते. वृक्ष लागवड वृक्षसंगोपन, बीज गोळा करणे अशा अनेक कामांची युवकांना आवड निर्माण होते. वृक्षलागवडीच्या कार्यात ते सक्रीय सहभागी होतात. वृक्ष चळवळी उभ्या करतात. सण समारंभात वृक्ष भेट देणे, पर्यावरण विषयक पुस्तकाची भेट देणे असे उपक्रम ते राबवितात. वनमहोत्सवांचे आयोजन व भेटी देणे अशी विविध कार्य करण्याची आवड युवकात निर्माण होते. महाविद्यालय परिसर व दत्तक गावात राष्ट्रीय सेवा योजनेच्या युवकांमुळे वनराई निर्माण होत आहे.

**१४) जलसंधारणाच्या कार्यात सहभाग**

NSS च्या माध्यमातून यूवक-युवतीमध्ये जलक्रांती घडून येत आहे. पाण्याची बचत करणे, पाण्याविषयी जागृती करणे हे उपक्रम युवक आपल्या पातळीवर राबवितात. शेततळी तयार करणे, समतलचर तयार करणे वनराई बंधारे बांधणे या उपक्रमात युवक सक्रीय सहभाग घेतात. परिणामी जलसाक्षर समाजाचे स्वप्न युवक प्रत्यक्षात आमलात आणतात.

**१५) स्वच्छता कार्यात सहभाग**

NSS च्या माध्यमातुन स्वच्छतेचा संस्कार युवकांवर होतो. आज महाराष्ट्रात अनेक गावे १०० टक्के हागणदारीमुक्त झाली. त्यात युवकांचा मोठा हात भार आहे. तसेच कौटुंबिक स्तरावर व स्वतःच्या जीवनात ते स्वच्छतेचे पालन करतात. संत गाडगे महाराजांचा स्वच्छतेचा मंत्र ते जीवनात अंगीकारतात. स्वच्छ भारत अभियानात युवकांनी सहभाग घेतला परिणाम आपला देश स्वच्छ करण्यात त्यांचा मोठा सहभाग होता.

**समारोप**

देशाच्या विकासाचा आधारस्तंभ म्हणजे युवक होय आणि या युवकांच्या व्यक्तीमत्वाच्या विकासाचे एक व्यासपीठ म्हणजेच राष्ट्रीय सेवा योजना. राष्ट्रीय सेवा योजना ही एक खुप मोठी चळवळ आहे. आणि या चळचळीशी जोडला गेलेला प्रत्येक नागरिक देश विकासाचा दुत आहे. कनिष्ठ महाविद्यालयीन स्तरावर कार्यक्रम अधिका-याच्या मार्गदर्शनाखाली अनेक युवक या योजनेतुन घडत आहेत. भिंतीपलीकडील शिक्षण म्हणजे राष्ट्रीय सेवा योजना होय. असे म्हणटल्यास वावगे ठरू नये. युवकात चांगले नेतृत्व निर्माण करून हि एक राष्ट्र चळवळ बनते.देशाच्या विकासात खुप मोठे योगदान राष्ट्रीय सेवा योजना देते म्हणुनचं राष्ट्रीय सेवा योजना ही राष्ट्र

विकासाची चळवळ बनली आहे. अशाप्रकारे युवक-युवती चांगल्याप्रकारे व्यक्तीमत्व विकास घेवुन ग्रामीण व शहरी भागातील विकासात संतुलन साधण्याचे काम राष्ट्रीय सेवा योजनाच्या माध्यमातुन युवक-युवती करीत आहे. मनुष्य बळ घडविण्याचे पायाभुत कार्य, युवक-युवती मार्फत होते.नवा भारत, नवा समाज परिवर्तन युवक-युवतींच्या माध्यमातुन होत आहे. अशाप्रकारे युवकांचा सर्वांगीण विकास होवुन त्या बरोबर समाजाचा व राष्ट्राचा विकास होवून समाज परिवर्तन घडुन येते.

थोडक्यात असे म्हणता येईल की, राष्ट्रीय सेवा योजना ही एक कनिष्ठ महाविद्यालयीन युवक-युवतीसाठी एक प्रेरणादायी योजना आहे. अशाप्रकारे राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून युवकांचा सर्वांगीण विकास होतो. जीवनातील कोणत्याही प्रश्नांवर मात करण्याची क्षमता त्यांच्या विकसीत होते. ख-या अर्थाने “Not Me But You” हा मंत्र युवक-युवती आपल्या जीवनात अंगीकारतात. भारत देश हा सर्वात तरूण देश आहे. या तरूणांना विधायक मार्गास लावण्यात राष्ट्रीय सेवा योजनेची भुमिका अत्यंत महत्वाची आहे. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातुन युवा पिढीवर चांगले संस्कार केले जातात हे कार्य असेच अव्याहतपणे चालू राहिल्यास भारत देश महासत्ता होण्यास वेळ लागणार नाही. एक संस्कारित पिढी निर्माण होत आहे. विविध क्षेत्रात सक्षमपणे कार्य करणारे युवक तयार होत आहेत. युवकांवर संस्कार करणारी योजना म्हणुन राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्व मोठे आहे.

**संदर्भग्रंथ सुची**

१) भिंताडे, डॉ.वि.रा (२००६) शैक्षणिक संशोधन पध्दती, पुणे नित्य नुतन प्रकाशन.

२) दांडेकर, वा.ना. (१९७४) शैक्षणिक मुल्यमापन व संख्याशास्त्र, पुणे विद्या प्रकाशन.

३) मुळे, रा.श., वि.तु.उमाठे (१९८७) शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे, नागपुरः महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, द्वितीय आवृत्ती.

४) पाठक, डॉ. सुहास, गणेश अ.मुडेगावंकर (२०१०) संशोधन आराखडा, औरंगाबाद, किर्ती प्रकाशन.

५) शेटकर डॉ. गणेश आणि जोशी डॉ. शोभना (२०१५)संशोधन अहवाल लेखन, औरंगाबादः मृण्मयी प्रकाशन.

७) चाकणे संजय, पाब्रेकर प्रमोद,(२०१०) राष्ट्रीय सेवा योजना संकल्पना, डायमंड पब्लिकेशन्स,पुणे.

८) डॉ. पंकजकुमार नन्नवरे, डॉ. संतोष खिराडे (२०२०) राष्ट्रीय सेवा योजना समाज जीवनातील योगदान, अथर्व पब्लिकेशन्स धुळे.

९) संशोधन मार्गदर्शक मालिका (पुष्प क्र.०१ ते १५) य.च.म.मु.वि., नाशिक.

१०) इंटरनेट वरून घेतलेली माहिती - संकलित लेख - संकलन लेखक.

११) शोध गंगा Shodganga.Inflibnet.ac.in

१२) शोध गंगोत्री.,कॉम. Shodgangotri.com

१३) विविध वर्तमानपत्रे, साप्ताहिके, मासिके, मार्गदर्शक पत्रिका, वार्षिक अहवाल, माहिती पुस्तीका, राष्ट्रीय सेवा योजनाचे मॅन्युअल यामधील तज्ञ मार्गदर्शकांचे लेख.